## प्रकरण तिसरे

## वाई नगरपालिकेची रचना

## प्रकरण तिसरे

## वाई नगरपालिकेची रचना

कोणत्याही संस्थेचा अभ्यास करीत असताना, त्या संस्थेच्या रचनात्मक आकृतिबंधाची माहिती समजून घेणे हे महत्वाचे ठरते. संबंधित संस्थेचे आजचे स्वरूप पाहण्या अगोदर संबंधित संस्थेच्या स्थापनेपासूनची काय स्थिती होती, त्यात कोणकोणती स्थित्यंतरे काळानुसार होत गेली, हेही पाहणे तितकेच महत्वाचे ठरते. कोणत्याही संस्थेचा विकास झटपट होत नसतो. काळाच्या ओघात, लोकमताचा कानोसा घेत घेत संस्थेमध्ये बदल होत असतात. हे सर्व बदल व स्थित्यंतरे यांची माहिती करून घेतल्यानंतरच आपणास संबंधित संस्थेच्या कार्याविषयी, तिच्या गुण-दोषाविषयी किंवा तिच्या एकूणच कार्यक्षमतेविषयी काही भाष्य करता येईल. अशी पार्श्वभूमी जाणून न घेता कोणत्याही संस्थेच्या कारभाराबद्दल किंवा प्रशासनाबद्दल भाष्य करणे हे त्या संस्थेवर अन्यायकारक ठरेल.

या प्रकरणामध्ये वाई नगरपालिकेच्या रचनेसंबंधी विचार केलेला आहे. वाई नगरपालिकेची स्थापना ५ डिसेंबर १८५५ रोजी झाली आणि त्यानंतर वाई शहरास दिनांक ८ जानेवारी १८५६ च्या सरकारी जाहीरनाम्याद्वारे १८५० चा २५ वा कायदा लागू केला.[१] वाई नगरपालिकेची स्थापना होऊन आज एकशे बत्तीस वर्षे पूर्ण झालेली आहेत. महाराष्ट्रात ज्या काही थोड्या जुन्या नगरपालिका आहेत त्यामध्ये वाई नगरपालिकेचा समावेश आपणास करावा लागेल. वाई नगरपालिकेच्या रचनेसंबंधी विचार करीत असताना या प्रदीर्घ कालखंडात वाई नगरपालिकेच्या रचनेमध्ये कोणकोणते बदल झाले हे समजून घेणे महत्वाचे ठरते.

१८५५ मध्ये वाई नगरपालिकेची स्थापना झाली तेव्हा नगरपालिकेची हद्द १.८७ चौरस कि.मी. एवढी निश्चित करण्यात आली होती. नगरपालिकेच्या हद्दीबाबतचा जाहीरनामा सरकारी गॅझेटमध्ये १९ नोव्हेंबर १८७४ मध्ये प्रथमच

प्रसिध्द झाला.[२] त्यावेळी वाई शहराला लागून असलेल्या सोनगीरवाडी व सिध्दनाथवाडी या दोन्ही वाडयांचा समावेश नव्हता. या दोन्ही वाडयांचा समावेश नगरपालिकेच्या हद्दीत करावा अशी विनंती नगरपालिकेने सरकारला जा.क्र. ४ क्र. २ अन्वये दिनांक १८ जानेवारी १८७८ रोजी केली. शासनाने १८७८ मध्ये दोन्ही वाडया वाई नगरपालिकेच्या हद्दीत सामील करण्यास मान्यता दिली. शहराच्या वाढत्या लोकसंख्येमुळे गावठाणाचे चोहकडे वाढीव भाग होते. त्यामुळेच नगरपालिका ठ.क्र. ४ दिनांक २४ एप्रिल १९५८ च्या ठरावानुसार नगरपालिकेने हद्दवाढीची शासनाकडे मागणी केली. शासनाने ७ जून १९६१ रोजी हद्दवाढीबाबत जाहीरनामा प्रसिध्द केला. १९ नोव्हेंबर १९६४ मध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या राजपत्रामध्ये शासनाने वरील हद्दवाढ मंजूर केली.[३] शहराच्या सततच्या विस्तारामुळे नगरपालिकेने अगदी अलिकडे म्हणजे ६ आक्टोबर १९८७ रोजी ठराव क्र. २० नुसार शासनाकडे शहराच्या हद्दवाढीबाबत पुन्हा मागणी केली आहे. वाई नगरपालिकेच्या हद्दीत सतत वाढ होत असल्याचे आढळून येते. सध्या वाई नगरपालिकेची हद्द ३.६३ चौरस कि.मी. इतकी निश्चित करण्यात आली आहे.[४] (कृपया नकाशा क्र. २ पहा).

<u>निवडणुकांना प्रारंभ</u> :

१८५५ मध्ये वाई नगरपालिकेची स्थापना झाल्यानंतर ८ जानेवारी १८५६ च्या सरकारी जाहीरनाम्याद्वारे सरकारी चार सभासद व शहरातील तीन नागरिकांच्या नेमणूका झाल्या. हे <u>७ सभासदांचे मंडळ १८६७ पर्यन्त</u> अस्तित्वात होते.

१८६७–६८ पासून नगरपालिकेच्या प्रतिनिधींच्या नियुक्तीबाबत सरकारने बदल केला असल्याचे दिसते. १८६७–६८ ते १८८५ पर्यन्तच्या काळामध्ये चार सरकारी अधिकारी व सरकारने नियुक्त केलेले नऊ नागरिक असे एकूण तेरा सभासदांचे बोर्ड अस्तित्वात आले.[५] सरकारी अधिका–यांपैकी कलेक्टर हे सर्व-

साधारण सभेचे चेअरमन म्हणून काम पहात असत. १८७४ नंतर कलेक्टर यांची अध्यक्ष व असि. कलेक्टर यांची उपाध्यक्ष व मामलेदार यांची मॅनेजिंग कमेटीचे चेअरमन म्हणून नेमणूका होत असत.[६] १८८५ पासून प्रथमच निवडणुकांना प्रारंभ झाला.

वाई नगरपालिकेच्या वाटचालीमध्ये १८८५ हे वर्ष महत्वाचा टप्पा समजले जाते. या वर्षी नगरपालिकेने एका नवीन पर्वात प्रवेश केला होता. वाई शहरातील थोड्या नागरिकांना का असेना प्रथमच मतदानाचा हक्क मिळणार होता. नागरिकांना त्यांचे प्रतिनिधी स्वत:च्या पसंतीने निवडता येणार होते. १८८५ पासून शहरातून प्रत्यक्षपणे आठ सभासद निवडून देण्याची पध्दत सुरू झाली.[७] याशिवाय सरकार नियुक्त आठ सभासद व नगरपालिकेचे अध्यक्ष असे एकूण सतरा जणांचे बोर्ड १८८५ पासून कारभार करू लागले. शहरातून प्रत्यक्ष-पणे आठ सभासद निवडून देण्याची पध्दत १९१९ पर्यन्त चालू होती.

१९१९ नंतरच्या काळामध्ये वाई नगरपालिकेच्या प्रतिनिधीत्वाच्या रचनेमध्ये बदल घडून आला. सरकारी ठराव क्र. ७२१८, १५ आक्टोबर १९१७ अन्वये नगरपालिकेस $\frac{२}{३}$ सभासद निवडण्याचा अधिकार मिळाला.[८] त्यानंतर कलेक्टर, सातारा यांचे पत्र क्र. ३५१ दिनांक २ मार्च १९२१ अन्वये $\frac{४}{५}$ सभासद निवडण्याचा अधिकार नगरपालिकेला मिळाला. १९१९ पासून पंधरा सभासदांचे बोर्ड अस्तित्वात आले. १९५६ पर्यन्त पंधरा सभासदांचेच बोर्ड अस्तित्वात होते.[९] १९१९ ते १९२३ दरम्यान लोकनियुक्त सभासद दहा असून पाच सरकार नियुक्त सभासद असत. १९२३ ते १ आक्टोबर १९३८ दरम्यान लोकनियुक्त बारा सभासद आणि सरकार नियुक्त तीन सभासद असत. दिनांक १ आक्टोबर, १९३८ नंतर सरकार नियुक्त सभासद पध्दती बंद झाली व संपूर्ण लोकनियुक्त सभासदांचे बोर्ड अस्तित्वात आले.[१०]

१८८५ मध्ये भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना झाल्यानंतर भारतातील स्वातंत्र्य चळवळीला नवा उठाव मिळू लागला. लोकांच्या राजकीय आकांक्षा जागृत होऊ लागल्या. नागरिकांमध्ये लोकशाहीबद्दलची ओढ वाढत गेली. त्याच बरोबर नागरिकांना मिळणाऱ्या हक्कांत व अधिकारांत वाढ होत गेली. भारतीय जनता आपल्या अधिकार व हक्कांबाबत तसेच प्रशासनातील सहभागाबाबत ब्रिटिशांकडे आग्रह धरू लागली. त्यामुळे ब्रिटिशांना मर्यादित प्रमाणात का असेना, भारतीय लोकांना प्रशासनात सहभागी करून घ्यावे लागले. स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये त्यांना प्रतिनिधित्व द्यावे लागले. मर्यादित प्रमाणात का असेना मतदानाचा हक्क भारतीयांना द्यावा लागला. या राष्ट्रीय चळवळीच्या वातावरणाचा परिणाम देशात सर्वत्र झाला. जे देशपातळीवर घडले त्याचे प्रतिबिंब वाई नगरपालिकेत न उमटते तर नवल.

१९२३ ते १९५२ पर्यन्त मुसलमानांसाठी एक राखीव जागा वाई नगरपालिकेत ठेवण्यात आली होती. १९५२ नंतर ही राखीव जागा रद्द करण्यात आली. तसेच १९३८ ते १९५२ एक जागा स्त्रियांकरिता म्हणून राखीव होती. हीच संख्या १९५२ पासून पुढे दोन करण्यात आली आहे. मागासवर्गीयांसाठी एक राखीव जागा १९३८ पासून ठेवण्यात आली आहे. १९८५ पासून आणखी एका राखीव जागेची भर पडल्याने सध्या मागासवर्गीयांसाठी दोन जागा राखून ठेवण्यात आल्या आहेत.

अध्यक्षांची निवड :

१९१० पासून नगरपालिकेच्या अध्यक्षीय निवडणुकांना प्रारंभ झाला.[११] नगरपालिकेच्या स्थापनेपासून १९१० पर्यन्त नगरपालिकेचे अध्यक्ष म्हणून कलेक्टर हेच काम पहात असत. तोपर्यन्त अध्यक्षांची निवड होत नसे. त्यांची नेमणूक सरकारमार्फत होत असे. नगरपालिकेच्या स्थापनेस (१८५५ ते १९१०) पन्नास वर्षे होऊन गेली तरीही हीच पध्दत सुरू होती. नागरिकांना अर्थातच आपण निवडून दिलेल्या सभासदांपैकी अध्यक्ष असावा अशी जाणीव होऊ लागली.

नगरपालिकेने ठरावाच्या रूपाने लोकनियुक्त सभासदांतील अध्यक्ष निवडून देण्याचा अधिकार नगरपालिकेस मिळावा अशी सरकारला विनंती केली. शासनाने नगरपालिकेस सरकारी ठ.क्र. ३४६८, २३ जुलै, १९१० अन्वये अध्यक्ष निवडून देण्याचा अधिकार बहाल केला.[१२] त्यानुसार वाई नगरपालिकेच्या अध्यक्षांची निवडणूक होऊन, पहिले लोकनियुक्त अध्यक्ष म्हणून कै. शंकर महादेव पाटणकर (वकील) यांची निवड आक्टोबर १९१० मध्ये झाली. १९१० पासून ते आजपर्यन्त वाई नगरपालिका केवळ ५ वर्षे, ११ महिने व २२ दिवस प्रशासकीय राजवटीखाली होती.[१३] याचाच अर्थ बाकीचा उर्वरित काळ नगरपालिकेचा कारभार लोकप्रतिनिधींकडून चालविला जात होता.

<u>मतदानाचा हक्क</u> :

नगरपालिकेची स्थापना झाल्यापासून सन १८८५ पर्यन्त मतदानाचा हक्क कोणालाच नव्हता. नगरपालिकेने मतदार कोणास म्हणावे यासंबंधीचे नियम केले. त्यानुसार प्रथमत: वार्षिक तीन रूपये कर देणाऱ्यास मतदानाचा हक्क मिळाला. ज्यांची स्थावर मिळकत एक हजाराची किंवा जंगम मिळकत पंधराशे रूपयांची असेल त्यानाही मतदानाचा हक्क मिळाला. यामुळे १८८५ मध्ये मतदारांची संख्या फक्त १०३० एवढीच मर्यादित होती.[१४] स्वातंत्र्यानंतर २१ वर्षांपुढील प्रत्येक भारतीय स्त्री-पुरूषास मतदानाचा हक्क मिळाला.

<u>कामकाजाची पध्दती</u> :

नगरपालिकेचा कारभार लोकाभिमुख व्हावा व शहरातील दैनंदिन प्रश्न कार्यक्षमतेने हाताळता यावेत म्हणून नगरपालिकेच्या पदाधिकाऱ्यांनी विविध समित्यांची स्थापना केली. एकट्या अध्यक्षांनी संपूर्ण कारभार करणे शक्य नव्हते. प्रारंभीच्या काळात कामाच्या सोयीसाठी पुढील विविध समित्या स्थापन करण्यात आल्या.

वाई नगरपालिकेच्या स्थापनेपासून ते १८८५ पर्यन्त फक्त एकच ' जनरल कमिटी ' होती. या कमिटीचे अध्यक्ष म्हणून कलेक्टर काम पहात असत. परंतु कामाचा व्याप वाढत गेला तसतसे विविध विभाग स्थापन करण्यात आले. त्यानुसार पुढील विविध समित्यांची निर्मिती करण्यात आली.

१) मॅनेजिंग कमिटी १८८६
२) दवाखाना कमिटी १८८९
३) सॅनिटरी कमिटी १८९७-९८
४) स्कूल कमिटी १८८६ ते १९२४ पर्यन्त.[१५]

वरील समित्या त्यांच्या अधिकारात व कार्यक्षेत्रात येणाऱ्या सर्व प्रश्नांचा अभ्यास करून, ते प्रश्न प्रभावी उपाययोजना करून कसे सोडविता येतील यासाठी प्रयत्नशील असत. सुरूवातीच्या काळात निर्माण केलेल्या वरील चार समित्यांमध्ये ' पाणी पुरवठा समिती ' चा उल्लेख आढळत नाही. कारण सुरूवातीच्या काळात शहराला पाणी पुरवठा करण्याची कोणतीच योजना अस्तित्वात नव्हती. त्या काळात शहरातील जवळजवळ सर्व नागरिक कृष्णा नदीच्या व घरात असलेल्या विहिरीच्या (आड) पाण्यावर अवलंबून असत. त्यामुळे सुरूवातीच्या काळात नगरपालिकेला पाणी पुरवठा समिती निर्माण करण्याची आवश्यकता भासली नाही.

दि.३ नोव्हेंबर १९५७ रोजी वाई नगरपालिकेची निवडणूक होऊन पंधरा सभासदांचे बोर्ड ११ डिसेंबर १९५७ पासून कारभार पाहू लागले. या काळात पुढील समित्या कार्यरत होत्या.

| | | |
|---|---|---|
| १) सर्वसाधारण सभा (जनरल बॉडी) | १५ सदस्य | ११ डिसेंबर १९५७ |
| २) कार्यकारी समिती | ७ सदस्य | -,,- |
| ३) आरोग्य समिती | ५ सदस्य | -,,- |
| ४) दवाखाना समिती | ५ सदस्य | -,,- |
| ५) शाळा समिती | ५ सदस्य | -,,-[१६] |

'सर्वसाधारण सभा ' ही या सर्व समित्यांमध्ये श्रेष्ठ होती. सर्वसाधारण सभेच्या मार्गदर्शनाखाली उर्वरित चार विषय समित्या आपला कारभार करीत असत. एखादा धोरणात्मक निर्णय घ्यावयाचा असेल तर तो निर्णय सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने घेतला जात असे. एका वार्ड मधून तीन याप्रमाणे शहरातील पाच वॉर्डस्मधून पंधरा सभासद निवडून आलेले होते.

२५ एप्रिल १९८५ रोजी झालेल्या निवडणुकीनंतर नवनिर्वाचित सभासदांचे बोर्ड अस्तित्वात आहे. या निवडणुकीचे वेळी शहरातील वॉर्डसूची संख्या वाढलेली होती. दि.३ नोव्हेंबर १९५७ साली झालेल्या निवडणुकीत वाई शहराचे पाच वॉर्डस् होते. तर २५ एप्रिल १९८५ मध्ये झालेल्या निवडणुकीमध्ये वाई शहराचे चोवीस वॉर्डस् तयार करण्यात आले. वॉर्डसूची संख्या वाढण्याचे कारण शहराच्या लोकसंख्येत झालेली वाढ होय. सध्या नगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची एकूण सदस्य संख्या सव्वीस असून पैकी चोवीस सदस्य प्रत्यक्ष लोकांनी निवडून दिलेले आहेत. या चोवीस सदस्यांपैकी दोन स्त्री सभासद असून दोन मागासवर्गीय सभासद आहेत. तसेच दोन सभासद नियुक्त केलेले आहेत.[१७] शहरातील लोकसंख्येच्या वाढीमुळे नगरपालिकेच्या कारभारात तसेच नागरी सुविधा नागरिकांना पुरविण्याबाबत नगरपालिकेला गतीने पावले उचलणे भाग पडले. दिनांक २५ एप्रिल १९८५ च्या निवडणुकीनंतर पुढील विविध विषय समित्यांची स्थापना केली. या विषय समित्या त्यांच्या निहित क्षेत्रातील कामकाज पहात असतात. या विषय समित्या व्यतिरिक्त नगरपालिकेने दोन खास समित्यांची स्थापना केलेली आहे. या विषय समित्या व खास समित्या तसेच त्यांची सभासद संख्या पुढीलप्रमाणे आहे :

| | |
|---|---|
| १) सर्वसाधारण सभा (जनरल बॉडी) | २६ सदस्य |
| २) स्थायी समिती | ८ सदस्य |
| ३) नियोजन, बांधकाम व विकास समिती | ५ सदस्य |

| | |
|---|---|
| ४) पाणी पुरवठा व जलनि:सारण समिती | ४ सदस्य |
| ५) वैद्यकीय व आरोग्य समिती | ४ सदस्य |
| ६) शिक्षण समिती | ४ सदस्य |

खास समित्या

| | |
|---|---|
| १) जकात समिती | ६ सदस्य |
| २) दुर्बल घटक विकास समिती | ४ सदस्य[१८] |

वाई नगरपालिकेच्या कार्यक्षेत्राच्या व लोकसंख्येच्या विस्तारामुळे विषय समित्यांची संख्या देखील वाढलेली दिसते. कारण या समित्यांमध्ये 'पाणी पुरवठा समिती' चा समावेश झालेला आहे. नगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या मार्गदर्शनानुसार या विषय समित्या आपले कामकाज पार-पाडीत असतात. नगरपालिकेची सर्वसाधारण सभा अधिकार संपन्न सभा आहे. नगरपालिकेच्या कोणत्याही समितीचे अधिकार कामे, कर्तव्ये यासंबंधी कोणतीही शंका उपस्थित झाल्यास त्यासंबंधीचा निर्णय नगरपालिकेच्या आधीन असतो.[१९]

वाई नगरपालिकेच्या विविध विषय समित्या व खास समित्या व त्यांची रचना पुढीलप्रमाणे आहे.

१) <u>स्थायी समिती</u> :

या समितीमध्ये आठ नगरसेवकांचा समावेश आहे. नगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेच्यानंतर अधिकाराच्या दृष्टीने विचार केल्यास स्थायी समितीचा क्रमांक लागतो. स्थायी समितीला अनेक अधिकार व कामे पार पाडावी लागतात. स्थायी समितीचे कार्यालयीन कामकाज एक वरिष्ठ लिपीक सांभाळतो. स्थायी समितीला सर्वात महत्वाचा कोणता अधिकार असेल तर ही समिती वीस हजार रुपये पर्यन्तच्या खर्चांना मंजुरी देते.[२०] वीस हजार रुपयांपेक्षा जास्तीच्या खर्चाला सर्वसाधारण सभेची मान्यता असणे आवश्यक ठरते.

२) <u>नियोजन, बांधकाम व विकास समिती</u> :

या समितीमध्ये पाच नगरसेवकांचा समावेश आहे.[२१]

नियोजन, बांधकाम व विकास समितीचे कार्यालयीन व अंमलबजावणी-विषयक कामकाज सध्या एक स्थापत्य अभियंता (ओव्हरसियर), एक मुकादम व एक रोड रोलर ड्रायव्हर पहात असतात. ही समिती शहराच्या नियोजना-संबंधीच्या बाबींचा विचार करते. तसेच चार हजार रुपयांपर्यन्तच्या नियोजन, बांधकाम विकासाबाबतच्या खर्चांना मंजुरी देण्याचा अधिकार या समितीला आहे. चार हजार रुपयांपेक्षा जादा रकमेच्या खर्चाला सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक असते.

३) <u>पाणी पुरवठा व जलनि:सारण समिती</u> :

या समितीमध्ये चार नगरसेवकांचा समावेश आहे.[२२]

पाणी पुरवठा व जलनि:सारण समितीचे कार्यालयीन व अंमलबजावणी विषयक काम करणारे एकूण पस्तीस कर्मचारी आहेत. ही समिती शहराच्या महत्वाच्या गरजेकडे म्हणजे पाणी पुरवठा व जलनि:सारण या बाबींकडे प्रामुख्याने लक्ष पुरवित असते. शहरातील नागरिकांना मुबलक व शुध्द पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे. त्याबाबत योग्य ती उपाययोजना या समितीला करावी लागते. तसेच पाणी पुरवठयाबाबतच्या चार हजार रुपयांपर्यन्तच्या खर्चांना मंजुरी देण्याचा अधिकार या समितीला आहे. चार हजार रुपयांपेक्षा जादा रकमेच्या खर्चाला सर्वसाधारण सभेची मंजुरी आवश्यक असते.

४) <u>स्वच्छता, विषयक, वैद्कीय व आरोग्य समिती</u> :

या समितीमध्ये चार नगरसेवकांचा समावेश आहे.[२३]

ही समिती शहराच्या आरोग्य रक्षणाच्या दृष्टीने महत्वपूर्ण मानली जाते. सध्या या समितीच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता विषयक कामे करणारे हंगामी व कायम असे एकूण बावन्न (५२) स्त्री-पुरुष कामगार आहेत. एक आरोग्य निरीक्षक, एक सहाय्यक आरोग्य निरीक्षक, दोन मुकादम व इतर कर्मचारी मिळून एकूण अठरा (१८) कामगार या समितीचे कामकाज सांभाळीत असतात. तसेच स्वच्छता विषयक, वैद्यकीय व आरोग्य रक्षणाच्या बाबतच्या चार हजार रुपयांपर्यन्तच्या खर्चांना मंजुरी देण्याचा अधिकार या समितीला आहे. याहून अधिकच्या खर्चाला सर्वसाधारण सभेच्या मान्यतेची आवश्यकता असते. शहराची स्वच्छता राखणे, नागरिकांना आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करून देणे तसेच शहरात आरोग्यविषयक उत्तम वातावरण राहील याकडे या समितीला लक्ष पुरवावे लागते व उपाययोजना कराव्या लागतात.

५) <u>शिक्षण समिती</u> :

या समितीमध्ये चार नगरसेवकांचा समावेश केलेला आहे.[२४]

नगरपालिकेची शिक्षण समिती प्रामुख्याने प्राथमिक शिक्षणाबाबत काम करीत असते. प्राथमिक शिक्षणाच्या कामामध्ये येणाऱ्या अडचणी निवारण करण्याचे काम या समितीला करावे लागते. या समितीचे कार्यालयीन कामकाज एक लिपीक सांभाळतो. प्राथमिक शिक्षणाबाबतच्या चार हजार रुपयांपर्यन्तच्या खर्चांना मंजुरी देण्याचा अधिकार या समितीला आहे. यापेक्षा जादा रकमेच्या खर्चाला सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक ठरते.

नगरपालिका शिक्षण समितीचा व्याप खूपच मोठा आहे. सध्या नगरपालिकेच्या अकरा मराठी माध्यमाच्या प्राथमिक शाळा आहेत. तर दोन इंग्रजी व दोन मराठी माध्यमाच्या प्राथमिक शाळा खाजगी संस्थाद्वारा चालविल्या

जातात. सध्या २६३३ मुले-मुली नगरपालिकेच्या शाळांमधून शिक्षण घेत आहेत. चौऱ्याऐंशी शिक्षक-शिक्षिका विद्यार्थ्यांना मार्गदर्शनाचे काम करीत आहेत.

वरील विषय समित्यांव्यतिरिक्त वाई नगरपालिकेने दोन खास समित्यांची स्थापना केली आहे. या समित्यांची रचना व कामे पुढील प्रमाणे आहेत.

१) <u>जकात समिती</u> :

या समितीमध्ये सहा नगरसेवकांचा समावेश केलेला आहे.[२५] जकात समिती ही महत्त्वपूर्ण खास समिती मानली जाते. कारण जकात हा नगरपालिकेच्या उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत आहे. त्यामुळे ही समिती अधिक कार्यक्षमतेने काम करेल तितके अधिक उत्पन्न नगरपालिकेला प्राप्त होत असते. या समितीला प्रामुख्याने पुढील कामे पार पाडावी लागतात.

<u>अधिकार व कामे</u> -

१. जकात नाक्यांची व्यवस्था नीट ठेवण्याबाबत तरतूद करणे.
२. शहरात येणाऱ्या जकात योग्य मालावर योग्य ती जकात आकारणी करणे.
३. जकात कर न भरता माल आणला गेल्यास, त्याबाबत योग्य ती कारवाई करणे.
४. जकातीचे परतावे परत करणे.

जकात समितीला तिच्या कामात मदत करण्यासाठी एक जकात निरीक्षक, एक सहाय्यक निरीक्षक, बावीस नाके कारकून व दोन शिपायी असे एकूण सव्वीस कर्मचारी या विभागात काम करीत आहेत. सध्या एकूण आठ जकात नाकी असून पैकी चार चोवीस तास चालू असतात व उर्वरित चार नाकी आठ तास काम करीत

असतात. जकात समितीला व या विभागात काम करणाऱ्या सर्वंच कर्मचाऱ्यांना जागरूकतेने काम करावे लागते. त्यांच्या जागरूकतेवरच नगरपालिकेचे जकातीपासून मिळणारे उत्पन्न कमी-जास्त होणे अवलंबून असते.

२) दुर्बल घटक विकास समिती :

या समितीमध्ये सध्या चार नगरसेवकांचा समावेश केलेला आहे. महाराष्ट्र शासनाच्या नगरविकासखात्याने नगरपालिका क्षेत्रात राहणाऱ्या मागासवर्गीयांसाठी नगरपालिकेने कल्याणकारी उपाययोजना राबवून या वर्गाची स्थिती सुधारणे हे नगरपालिकेवर बंधनकारक आहे. असे आदेश काढले. मागासवर्गीय लोकांच्यासाठी एक खास समिती नेमावी. तिला ' मागासवर्गीय कल्याण विशेष समिती ' असे संबोधण्यात यावे. या समितीचा सभापती मागासवर्गीय सभासदांपैकी असावा. या समितीमध्ये सभापतीसह पाचपेक्षा जास्त सभासद नसावेत असेही आदेश दिलेले आहेत.[२६] त्यानुसार वाई नगरपालिकेने १९८४ मध्ये या समितीची स्थापना केली.

या समितीने मागासवर्गीय घटकांच्या उन्नतीसाठी खर्च करावयाचा आहे तो कोणत्या योजनांवर खर्च करावयाचा याचा तपशील नगरपालिकेस वेळोवेळी सादर करावा, त्यावर नगरपालिकेच्या खास अगर विशेष सभेमध्ये त्याबाबत विनाविलंब निर्णय घेण्यात यावा असे मान्य करण्यात आलेले आहे.

मागासवर्गीयांबाबतच्या शासनाच्या प्रचलित धोरणानुसार नगरपालिकेने आपल्या महसूली उत्पन्नातील ' बांधील निधी '* वजा जाता राहिलेल्या उत्पन्नाचा ५ टक्के भाग राखीव निधी म्हणून काढावा.[२७] तो दुर्बल घटकांच्या म्हणजेच अनुसूचित जाति-जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती यांच्या कल्याणकारी योजनेसाठी खर्च करावयाचा आहे. सदर ५ टक्के राखीव निधी दुर्बल घटकांच्यासाठी असणाऱ्या पुढीलपैकी कोणत्याही कल्याणकारी योजनेसाठी नगरपालिकेला खर्च करता येईल.

१. मैला वाहून नेण्यासाठी लागणाऱ्या गाड्या-हातगाड्या वापरून डोक्यावरून मैला नेण्याची पध्दत बंद करण्याच्या योजना.

२. दुर्बल घटकांच्या वसाहतीत पाणी पुरवठा योजना-मलनि:सारण योजनांचे सुधारणा करण्यासाठी.

३. अशा वसाहतीमध्ये उद्याने, बगीचे, धर्मशाळा, सार्वजनिक हॉल, मनोरंजनाची साधने पुरविण्याकरिता.

४. या घटकातील रहिवाशांना निदान नगरपालिकेच्या या घटकातील कर्मचाऱ्यांना घरासाठी जागा किंवा छोटी घरे-झोपड्या बांधून देण्यासाठी.

५. मागासवर्गीय घटकातील प्राथमिक व माध्यमिक शाळांतील हुषार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देण्यासाठी.

६. मागासवर्गीय वस्तीमध्ये रस्ते बांधणीसाठी.

७. मागासवर्गीय वस्तीमध्ये वैद्यकीय केंद्र बांधण्यासाठी.

८. मागासवर्गीयांसाठी नवीन प्रकारचे कमी किमतीचे संडास बांधण्यासाठी.

९. मागासवर्गीय वसाहतीमध्ये नळाचे खाजगी कनेक्शान्स देण्यासाठी, अगर नलिकाकूपे खोदण्यासाठी.

१०. या घटकातील लोकांच्या मुलांना पौष्टिक आहार पुरविण्यासाठी.

११. मागासवर्गीय वसाहतीमध्ये ग्रंथ संग्रहालये, वाचनालये या सुविधांची तरतूद करण्यासाठी.

१२. या घटकातील लोक बहुसंख्येने रहात असतील अशा ठिकाणच्या गलिच्छ वस्त्यांमध्ये सुधारणा करण्यासाठी किंवा सुविधा पुरविण्यासाठी हा निधी वापरला जावा असे शासनाचे आदेश आहेत.

१९५७ ते १९८५ दरम्यान वाई नगरपालिकेच्या पाच सार्वत्रिक निवडणुका पार पडल्या हे तक्ता क्र.३.१ वरून स्पष्ट होते.

तक्ता क्र.३.१

वाई नगरपालिका निवडणूका

| निवडणूक वर्ष | एकूण वॉर्ड्स | निर्वाचित नगरसेवक | कॉंग्रेस | संयुक्त महाराष्ट्र समिती | जनसंघ-भाजपा | शे.का. पक्ष | समाजवादी-जनता पक्ष | कम्युनिस्ट | इतर संघटना-स्वतंत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९५७ | ५ | १५ | १२ | ३ | - | - | - | - | - |
| १९६२ | ५ | १५ | ११ | - | - | - | - | - | ४ स्वतंत्र |
| १९६७ | ५ | १५ | ११ | - | - | - | - | - | ४ स्वतंत्र |
| १९७४ | २२ | २२ | १६ | - | - | - | - | - | ६ नागरी संघटना |
| १९८५ | २४ | २४ | ९ इं.कॉं.<br>६ स.कॉं. | - | ५ | - | २ | - | २ स्वतंत्र |

आधार : माजी नगराध्यक्ष सर्वश्री डॉ प्र.शं. मराठे व राजाभाऊ जाधव यांच्या मुलाखती.

१९६७ नंतर वास्तविक पहाता १९७२ साली निवडणूक होणे आवश्यक होते. परंतु प्रत्यक्षात निवडणूक १९७४ मध्ये झाली. त्यानंतर देखील १९७९ मध्ये निवडणूक न होता १९८५ मध्ये निवडणूक पार पडली. निवडणूका दर पाच वर्षांनी न होता शासनाच्या सोयीप्रमाणे घेतल्या जात होत्या असे दिसते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका दर पाच वर्षांनी नियमितपणे घेतल्या जाव्यात अशी तरतूद असताना देखील तिचे पालन झाल्याचे दिसत नाही. १९५७ पासून ते १९७४ पर्यन्तच्या निवडणूकांमध्ये अधिकृतपणे कोणत्याही राजकीय पक्षाने भाग घेतलेला नव्हता. परंतु १९८५ मध्ये झालेल्या निवडणूकीमध्ये प्रथमच विविध राजकीय पक्षांनी एकत्र येऊन `पुरोगामी लोकशाही दल` या नावाने आघाडी करून निवडणूक लढविली. पुरोगामी लोकशाही दलाच्या विरोधात असणाऱ्या इंदिरा कॉंग्रेसने पक्षाच्या अधिकृत चिन्हावर निवडणूक न लढविता स्वतंत्र चिन्ह घेऊन निवडणूक लढविली. १९५७ ते १९७४ या काळात झालेल्या निवडणूकांमध्ये कॉंग्रेस पक्षाला मानणाऱ्या कार्यकर्त्यांचे म्हणजेच पर्यायाने कॉंग्रेस पक्षाचे बहुमत असल्याचे दिसून येते. परंतु १९८५ मध्ये झालेल्या निवडणूकीमध्ये प्रथमच विविध राजकीय पक्ष एकत्र आलेल्या `पुरोगामी लोकशाही दला` च्या आघाडीला बहुमत मिळाले. प्रथमच नगरपालिकेची सत्ता विरोधी पक्षांच्या हाती गेली. समाजवादी कॉंग्रेसचे इंदिरा कॉंग्रेसमध्ये सामिलीकरण झाल्यानंतर ही सामिलीकरणाची प्रक्रिया उशिराने का होईना वाई नगरपालिकेमध्येही घडून आली. त्यामुळे पुरोगामी लोकशाही दलाच्या आघाडीची दोन वर्षांची अल्पसत्ता संपुष्टात येऊन, नगरपालिकेची सत्ता, पुन्हा कॉंग्रेसच्या हाती गेली. पुरोगामी लोकशाही दलाच्या आघाडीचा दोन वर्षांचा अपवाद वगळल्यास नगरपालिकेची सत्ता ही निर्विवादपणे कॉंग्रेसकडेच होती. १९५७ ते १९८५ या काळात पार पडलेल्या पाचही निवडणूकांमध्ये शे.का. पक्ष व कम्युनिस्ट पक्षाचा एकही कार्यकर्ता निवडून आला नाही. सुरुवातीच्या तीन निवडणूकींमध्ये लोकसंख्येच्या वाढीप्रमाणे वॉर्डसूची संख्या वाढली नाही परंतु १९७४ व १९८५ मध्ये झालेल्या निवडणूकींमध्ये लोकसंख्येच्या प्रमाणात वॉर्डसूची संख्या वाढलेली

आळून येते. १९८५ च्या निवडणुकीचा अपवाद वगळता कॉंग्रेस पक्षाला तुल्यबळ विरोधी पक्षाचा नगरपालिकेत अभाव दिसतो.

स्वातंत्र्यानंतर वाई नगरपालिकेला डिसेंबर १९८७ अखेर लाभलेल्या मुख्याधिकाऱ्यांची यादी तक्ता क्र.३.२ मध्ये दिलेली आहे.

तक्ता क्र.३.२

वाई नगरपालिकेचे मुख्याधिकारी

| अ.क्र. | मुख्याधिकाऱ्याचे नाव | कारकीर्द |
|---|---|---|
| १) | कै. अ.वा. विद्वांस | २१-५-४७ ते ३१-३-६२ |
| २) | श्री. अ.गो. खटावकर | १-४-६२ ते ७-९-७६ |
| ३) | श्री. एम्.पी. माळवदे | ८-९-७६ ते १९-९-७६ |
| ४) | श्री. ह.पां. कुलकर्णी | २०-९-७६ ते २५-८-७७ |
| ५) | श्री. पी.एस. मालेराव | २६-८-७७ ते ३१-१-७८ |
| ६) | श्री. के.एन. दंडवते | १-२-७८ ते १३-४-७८ |
| ७) | श्री. वि.या. जाधव | १४-४-७८ ते १८-८-८० |
| ८) | श्री. वि.कृ. कुंभार | १८-२-८० ते ५-२-८१ |
| ९) | श्री. वि.कृ. कुंभार | ७-७-८१ ते १९-७-८१ |
| १०) | श्री. पी.जे. ओरपे | १७-८-८१ ते ९-२-८२ |
| ११) | श्री. बी.जी. बोडस | १४-१-८२ ते १७-२-८२ |
| १२) | श्री. सी.एन. नातू | १८-२-८२ ते २३-११-८३ |
| १३) | श्री. एस.टी. डिसले | २४-११-८३ ते १६-१०-८५ |
| १४) | श्री. खैरमोडे | १७-१०-८५ ते १७-११-८५ |
| १५) | श्री. सु.अ. धाराशिवकर | १८-११-८५ ते |

आधार : वाई नगरपालिका कार्यालयातील नामफलकावरून.

डिसेंबर १९८७ अखेर नगरपालिकेला पंधरा मुख्याधिकारी लाभले. पहिल्या दोन म्हणजे के. अ.वा. विद्वांस व श्री. अ.गो. स्टावकर या दोन मुख्याधिकाऱ्यांची प्रदीर्घ कारकीर्द वगळल्यास गेल्या सुमारे बारा वर्षांत नगरपालिकेला तेरा मुख्याधिकारी लाभले. या तेरा मुख्याधिकाऱ्यांपैकी एकाचीही कारकीर्द प्रदीर्घ अशी नाही हे लक्षात येते. नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांच्या सतत बदल्या होण्यामुळे नगरपालिकेच्या दैनंदिन कारभारावर त्याचा विपरीत परिणाम होत आहे.

या प्रकरणाच्या विवेचनावरून वाई नगरपालिकेच्या आतापर्यंतच्या वाटचालीची व रचनेची कल्पना येते. प्रशासकीय, रचनात्मक व जबाबदारीची अनेक स्थित्यंतरे झालेली आढळून येतात. प्रशासकीय राजवटीचा अल्पसा काळ सोडल्यास बाकीचा सर्व कालावधी वाई नगरपालिका ही लोकप्रतिनिधींच्या हाती होती हे महत्वाचे आहे. वाढत्या लोकसंख्येबरोबरच शहराचा विस्तारही वाढता दिसतो आहे. कारण नगरपालिकेने शहराच्या हद्द वाढीची मागणी सतत शासनाकडे केलेली आहे. स्वातंत्र्यानंतर सर्वांना मतदानाचा अधिकार मिळाला. वाढत्या लोकसंख्येबरोबरच नवनवीन समस्या नगरपालिका प्रशासनासमोर उभ्या रहात आहेत. साहजिकच नगरपालिकेच्या प्रशासकीय कारभाराचा विस्तारही झालेला दिसून येतो. स्वातंत्र्यानंतरच्या कालखंडामध्ये पुरोगामी लोकशाही दलाच्या आघाडीचा दोन वर्षांचा अपवाद वगळल्यास नगरपालिकेची सत्ता कॉंग्रेसच्या किंवा कॉंग्रेसला मानणाऱ्या कार्यकर्त्यांच्या हाती आहे. स्वातंत्र्यानंतरच्या काळामध्ये तर कल्याणकारी राज्याच्या कल्पनेच्या स्विकारामुळे नगरपालिकांची जबाबदारी वाढलेली आहे. आपल्या मर्यादित क्षेत्रातील रहिवाशांना नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याची महत्वपूर्ण जबाबदारी नगरपालिकेला आज पार पाडावी लागत आहे. विविध विषय समित्या, खास समित्या स्थापन करून नागरी प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी नगरपालिका प्रयत्न करते आहे. त्यात यश किती आणि अपयश किती हा भाग वेगळा.

## संदर्भ

१) वाई नगरपालिका शतसांवत्सरिक महोत्सव स्मृतिग्रंथ, १९५८-५९, पृ.१०.
२) तत्रैव, पृ. १०.
३) वाई नगरपालिकेच्या कार्यालयीन दप्तरातील नोंदीतून.
४) सेन्सस ऑफ इंडिया, १९८१, सातारा डिस्ट्रिक्ट हॅन्ड बुक, पृ. १७०.
५) वाई नगरापलिका शतसांवत्सरिक महोत्सव स्मृतिग्रंथ, १९५८-५९, पृ. १०.
६) तत्रैव.
७) तत्रैव, पृ. ११.
८) तत्रैव.
९) तत्रैव.
१०) तत्रैव.
११) तत्रैव.
१२) तत्रैव.
१३) वाई नगरपालिकेच्या कार्यालयातील अध्यक्षीय नामफलकावरून.
१४) वाई नगरपालिका शतसांवत्सरिक महोत्सव स्मृतिग्रंथ, १९५८-५९, पृ. ११.
१५) तत्रैव, पृ. १२.
१६) तत्रैव, पृ. २८.
१७) वाई नगरपालिका, कार्यालयीन दप्तरातील नोंदीतून.
१८) तत्रैव.
१९) महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग-१-अ पुरवणी (पुणे विभाग), ८ जून, १९७८, पृ. २२५.
२०) वाई नगरपालिका, कार्यालयीन दप्तरातील नोंदीतून.
२१) तत्रैव.
२२) तत्रैव.
२३) तत्रैव.

२४) तत्रैव.

२५) तत्रैव.

२६) महाराष्ट्र शासन, नगरविकास खाते, परिपत्रक क्र. बी.सी.सी १०८४-२९११-सी आर-२१९-८४-यूडी १० मंत्रालय, मुंबई, दिनांक २१ नोव्हेंबर, १९८४.

२७) महाराष्ट्र शासन, नगरविकास व आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई, परिपत्रक क्र. बीसीसी-६०५६-यूडी १० दिनांक २३ जुलै १९८२.

*<u>बांधील निधी म्हणजे</u> -

१. नगरपालिकेने घेतलेल्या कर्ज परत फेडीसाठी देय असलेले मुद्दल व व्याज.
२. राखीव वेतन निधी - पाणी पुरवठ्याबाबत नगरपालिकेने राखून ठेवावयाचा निधी.
३. कर्मचाऱ्यांचे पगार व भत्ते यावरील खर्च.
४. कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्ती निधी, यामध्ये जमा करावयाचा निधी.
५. नगरपालिकेच्या विविध योजनांसाठी गोळा करण्यात आलेली वर्गणी.
६. नगरपालिकेने प्राथमिक शिक्षण अधिनियमानुसार जिल्हा परिषदांना द्यावयाची प्राथमिक शिक्षणाबाबतची वर्गणी.
७. नियमाप्रमाणे ठेवावा लागणारा किमान रोख निधी.